# नाशिक महानगरपालिका,नाशिक
## जाहिरात व परवाने विभाग
राजीव गांधी भवन(मुख्यालय), शरणपुररोड नाशिक -४२२ ००२

✉ – dmc_ lic@nmc.gov.in ✆ (०२५३)२२२२४७६


### जाहिर प्रकटन

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तमाम नागरिक, पदाधिकारी, राजकिय पक्ष, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक व क्रीडा इ. संस्था व सर्व क्षेत्रातील मान्यवरांना कळविण्यात येते कि, शुभेच्छा, वाढदिवस, सामाजिक, शैक्षणिक, राजकिय, धार्मिक व भावपुर्ण श्रध्दांजली इ. कार्यक्रमासाठी मनपा नाशिक सर्व विभागीय कार्यालयातील कार्यक्षेत्रामध्ये मुख्य चौक, रस्ते इ. ठिक-ठिकाणी मनपा मालकीच्या खुल्या जागेत **१८१ तात्पुरता स्वरुपात जाहिरात शुभेच्छा फलक / जाहिराती लावणे / प्रसिध्द करणेकरीता जागा निश्चित केलेल्या आहेत.** सदर जागा / ठिकाणांची यादी मनपाचे www.nmc.gov.in या संकेतस्थळावर व मनपा नाशिक सर्व विभागीय कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार, व्यक्ती / अभिकरणे / संस्था यांनी मनपाच्या ज्या विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात तात्पुरता स्वरुपाचे जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. लावणे / प्रसिध्द करावयाची असल्यास संबंधित विभागीय कार्यालयाचे नागरी सुविधा केंद्रात विहित मुदतीत रितसर अर्ज दाखल करून संबंधित विभागाची परवानगी प्राप्त करून सदरच्या तात्पुरता स्वरुपाचे जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर / पोस्टर्स व आकाश-चिन्ह इत्यादींवर अर्जदाराचे नांव, परवानगी क्रमांक, परवानगी दिलेले ठिकाण व परवानगीचा कालावधी इ. माहिती असणारा **QR कोड** दर्शनी भागावर प्रदर्शित करण्यात यावा. अशा प्रकारचे जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. जाहिराती अधिकृत मानण्यात येतील.

**QR कोड** दर्शनी भागावर प्रदर्शित न केलेले तसेच, मनपाने निश्चित केलेल्या जागा व्यतिरिक्त अनधिकृपणे उभारणी / प्रसिध्दी केलेले जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. अनधिकृत मानण्यात येतील. त्यामुळे सर्व नागरिक, पदाधिकारी, राजकिय पक्ष, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक व क्रीडा इ. संस्था व सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी नियमाप्रामणे परवानगी घेऊन जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. जाहिराती उभारावे व नाशिक महानगरपालिकेस सहकार्य करावे.

त्याचप्रमाणे असे निदर्शनास आले कि, नाशिक शहरातील विविध राजकीय पदाधिकारी, सांस्कृतिक मंडळे व नागरिक हे जाहिरात शुभेच्छा / वाढदिवस / सामाजिक / शैक्षणिक / राजकीय / धार्मिक / श्रध्दांजली व इतर जाहिराती शहरातील विविध खाजगी आस्थापनेतील छपाई करणारे छपाईदार जाहिरात फलकांची छपाई करुन मनपा/खाजगी जागेत विनापरवाना/अनधिकृत जाहिरात लावणेचे कामकाज करतात.त्यानुसार सदर शहरातील विविध खाजगी छपाईदार हे जाहिरात धारकांनी मनपाचे तात्पुरता स्वरुपात जाहिरात जागा लायसन्स फी व जाहिरात कराचा भरणा व लेखी परवानगी घेतलेली आहे किंवा नाही ? हे न बघता मनपा / खाजगी जागेत जाहिराती उभारणी / प्रसिध्दी करीता परस्पर जाहिरात फलकाची उभारणी करतात.सदर शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. जाहिरात फलक छपाई करणारे फलक मुद्रालणालय व्यावसायिक यांना सुचित करण्यात येते की मनपाची परवानगी असल्याशिवाय सदर बॅनर,फ्लेक्स,होर्डिंग,जाहिरात फलक छपाई करण्यात येऊ नये.

तसेच, खाजगी / खाजगी जागेतील बांधकाम क्षेत्रामध्ये व मनपा जागेत विनापरवाना / अनधिकृतपणे कोणतीही परवानगी / लायसेंन्स न घेता आकाश-चिन्ह / जाहिरात फलक / तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. उभारणी केलेले आहेत. तसेच, ज्या आकाश-चिन्ह / जाहिरात फलकांचे नुतनीकरण कालावधी संपुष्ठात येऊनही त्यांचे नुतनीकरण न करता अनधिकृत स्ट्रक्चर

उभारणी अथवा वापर केला जातो, अशा सर्व प्रकारचे आकाश- चिन्ह / जाहिरात फलक / तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. जाहिराती दि.१५ मे, २०२५ पुर्वी संबंधितांनी स्वत:हून काढून घ्यावेत. दिलेल्या मुदतीत न काढल्यास जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि. ३१/०१/२०१७ रोजीचे आदेशान्वये तसेच,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम, २४४ व २४५ व महाराष्ट्र महानगरपालिका [आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ इ. नुसार सर्व अनधिकृत आकाश-चिन्ह / जाहिरात फलक / जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. निष्कासित करून जप्त करणेची कारवाई करणेत येईल तसेच, महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करणेकरिता अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार ३ महिने कैद किंवा र.रु. २०००/- दंड किंवा दोन्ही एकत्रित होऊ शकते. तसेच सदरचे अनधिकृत जाहिरात फलक निष्कासित करणेकरिता येणारा सर्व खर्च संबंधित अनधिकृत जाहिरात धारकाकडून व अभिकरणांकडून नियमानुसार वसूल करणेत येईल. सदर बाबत पुढील होणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी अनधिकृतपणे सर्व प्रकारचे आकाश-चिन्ह / जाहिरात फलक / तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. उभारणारे नागरिक, पदाधिकारी, राजकिय पक्ष,फलक मुद्रालणालय व्यावसायिक,सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक व क्रीडा इ. व्यक्ती / संस्था याची राहील, याची नोंद घ्यावी.

(मनिषा खत्री भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
**नाशिक महानगरपालिका, नाशिक.**

ध्द